# प्रस्तावना

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या स्थापनेनंतर केवळ २ वर्षात म्हणजेच एप्रिल १९२१ मध्ये मुंबई कामगार कार्यालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. मुंबई येथे कामगार आयुक्त कार्यालय सन एप्रिल २०२१ पासून कामगार आयुक्त कार्यालयाचे शताब्दीवर्ष सुरु झालेले आहे.

कामगारांच्या कल्याणासाठी विविध कामगार कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी तसेच औद्योगिक संबंध सुरळीत राहण्यासाठी कामगार कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे.

विविध कामगार कायद्यांची अंमलबजावणी करून कामगारांना अधिनियमांचे फायदे मिळवून देणे व सामाजिक सुरक्षितता प्रदान करणे तसेच कामगार व मालक यांच्यामधील औद्योगिक विवादात वेळीच मध्यस्थी करून समेट घडवून आणणे व औद्योगिक क्षेत्रातील शांतता कायम राखणे ही दोन महत्वाची कार्ये कामगार आयुक्तालयातर्फे पार पाडली जातात. कामगार व मालक यांच्याशी समन्वय साधून कामगार आयुक्तालयाचा कारभार जबाबदार, गतिमान, पारदर्शक व लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने कामगार आयुक्तालयाने नागरिकांची सनद तयार केली आहे.

कामगार आयुक्तालयाची नागरिकांची सनद जुलै २०२५ रोजी अद्यावत करण्यात आली आहे.

(डॉ. एच.पी. तुम्मोड, भा.प्र.से.)
कामगार आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई

**कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई व त्यांच्या अधिपत्याखालील विभागीय जिल्हा व जिल्हा कार्यालयाकरिता नागरिकांची सनद.**

**प्रस्तावना:-**

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या स्थापनेनंतर (आय.एल.ओ) केवळ 2 वर्षात म्हणजे एप्रिल 1921 मुंबई कामगार कार्यालयाची स्थापना झाली. प्रत्यक्षात ही स्थापना त्या वेळेचे मुंबई प्रांत गव्हर्नर लॉर्ड लाईड यांनी केली. कदाचित त्यावेळेत अशा प्रकाराची स्थापना झालेले संपूर्ण भारतातील हे पहिले कार्यालय होते.

कामगार आयुक्त कार्यालयांचे मुख्यालय मुंबई येथे असून या कार्यालयाच्या अधिपत्याखाली खालील प्रमाणे प्रादेशिक कार्यालये कार्यरत आहेत.

| अ.क्र. | विभागीय कार्यालये | मुख्यालय |
|---|---|---|
| १. | कोकण | मुंबई |
| २. | पुणे | पुणे |
| ३. | नागपूर | नागपूर |
| ४. | अमरावती | अमरावती |
| ५. | नाशिक | नाशिक |
| ६. | छत्रपती संभाजी नगर | छत्रपती संभाजी नगर |

**कामगार आयुक्त मुख्य कार्यालय**

**कामगार आयुक्त**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कोकण विभाग | नाशिक विभाग | छत्रपती संभाजी नगर | नागपूर विभाग | अमरावती विभाग | पुणे विभाग |
| अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग, मुंबई | कामगार उप आयुक्त, नाशिक | कामगार उप आयुक्त, छत्रपती संभाजी नगर | अपर कामगार आयुक्त, नागपूर | कामगार उप आयुक्त,अमरावती | अपर कामगार आयुक्त, पुणे |

**कोकण विभाग**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कामगार उप आयुक्त, ठाणे | कामगार उप आयुक्त, रायगड | कामगार उप आयुक्त, पालघर | सहायक कामगार आयुक्त, रत्नागिरी | सरकारी कामगार अधिकारी, सिंधुदुर्ग |

| | |
|---|---|
| सहायक कामगार आयुक्त कल्याण | सहायक कामगार आयुक्त, भिवंडी |

**नाशिक विभाग**

कामगार उप आयुक्त, नाशिक

| | | | |
|---|---|---|---|
| सहायक कामगार आयुक्त, जळगाव | सरकारी कामगार अधिकारी, धुळे | सहायक कामगार आयुक्त, अहमदनगर | सरकारी कामगार अधिकारी, मालेगाव |

**पुणे विभाग**
अपर कामगार आयुक्त, पुणे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कामगार उप आयुक्त, पुणे | सहायक कामगार आयुक्त, सातारा | सहायक कामगार आयुक्त, कोल्हापूर | सहायक कामगार आयुक्त, सोलापूर | सहायक कामगार आयुक्त, सांगली | सरकारी कामगार अधिकारी, इचलकरंजी |

सरकारी कामगार अधिकारी, बार्शी

**छत्रपती संभाजी नगर विभाग**
कामगार उप आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सहायक कामगार आयुक्त, नांदेड | सहायक कामगार आयुक्त, लातूर | सरकारी कामगार अधिकारी, धाराशीव | सरकारी कामगार अधिकारी, जालना | सरकारी कामगार अधिकारी, परभणी | सरकारी कामगार अधिकारी, बीड | सरकारी कामगार अधिकारी, हिंगोली |

**नागपूर विभाग**
अपर कामगार आयुक्त, नागपूर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सहायक कामगार आयुक्त, गोंदिया | सहायक कामगार आयुक्त, चंद्रपूर | सहायक कामगार आयुक्त, भंडारा | सरकारी कामगार अधिकारी, तुमसर | सरकारी कामगार अधिकारी, गडचिरोली | सरकारी कामगार अधिकारी, वर्धा |

**अमरावती विभाग**
कामगार उप आयुक्त, अमरावती

| | | | |
|---|---|---|---|
| सरकारी कामगार आयुक्त, अकोला | सरकारी कामगार अधिकारी, यवतमाळ | सरकारी कामगार अधिकारी, बुलढाणा | सरकारी कामगार अधिकारी, वाशिम |

२. प्रथमतः हे कार्यालय एका संचालकाच्या अखत्यारित होते. सन १९२६ साली या कार्यालयाचे पदनाम बदलून ते संचालक, माहिती व कामगार इंटिलिजन्स असे ठेवण्यात आले. याचवेळी कामगार आयुक्त यांची पदसिध्द आयुक्त, श्रमिक भरपाई म्हणून नियुक्ती केली होती. सन १९३९ साली या कार्यालयाचे विभाजन करुन कामगार आयुक्त व माहिती संचालक अशी वेगवेगळी कार्यालये करण्यात आली. १९४७ साली मुंबई कामगार सन कार्यालयाची पुनर्रचना करण्यात येऊन दोन वेगळे संचालक करण्यात आले. १) संचालक, कामगार प्रशासन व (२) संचालक, कामगार कल्याण, सन १९५३ पूर्वी मुंबई कामगार कल्याण मंडळाची स्थापना होईपर्यंत कामगार कल्याणचे काम हे संचालक कामगार (कल्याण) यांचेमार्फत कामगार आयुक्त कार्यालयांमार्फत पाहिले जात असे. सन १९५३ नंतर वेगळया मुंबई कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली, सन १९७९ मध्ये कामगार कार्यालयाची फेररचना करण्यात येऊन त्यांचे प्रशासकीय दृष्टीने तीन विभाग करण्यात आले. १) मुख्य कार्यालय २) मुंबई विभाग कार्यालय व ३) मुंबई जिल्हा कार्यालय, कामगार कार्यालयाचे प्रमुख हे कामगार आयुक्त आहेत. त्यांचे मुख्य कार्यालय कामगार भवन, ब्लॉक ई, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ येथे आहे.

३. कोकण, पुणे व नागपूर या विभागाकरिता अपर कामगार आयुक्त या दर्जाचे अधिकारी प्रादेशिक प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. तर तसेच नाशिक, औरंगाबाद व अमरावती विभागाकरिता कामगार उप आयुक्त दर्जाचे अधिकारी कार्यरत आहेत. तसेच सर्व जिल्हयांच्या ठिकाणी सहाय्यक्त कामकाजाची व्याप्ती कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी या दर्जाचे अधिकारी जिल्हा कार्यालय प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. कामकाजाची व्याप्ती लक्षात घेऊन मुंबई शहर, मुंबई उपनगर(पूर्व), मुंबई उपनगर (पश्चिम), ठाणे, पुणे, पालघर, रायगड या जिल्हयाकरिता कामगार उप आयुक्त या दर्जाचे अधिकारी जिल्हा प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये वेगवेगळया जिल्हयांच्या ठिकाणी ३६ माथाडी मंडळे व १५ सुरक्षा मंडळे देखील कार्यरत असून त्यांचे वर कामगार आयुक्त कार्यालयामार्फत नियंत्रण ठेवले जाते.

४. कामगार आयुक्तालयाकडून खालील महत्वाची कार्य केली जातात.

(अ) विविध कामगार कायद्याची अंमलबजावणी करुन अधिनियमांचे फायदे कामगारांना मिळवून देणे.

(आ) कामगार व मालक (यांच्या मध्ये कामगारांच्या प्रश्नावरुन निर्माण होऊ पहाणाऱ्या किंवा निर्माण झालेल्या औद्योगिक विवादात वेळीच मध्यस्थी करुन समेट घडवून आणणे व औद्योगिक क्षेत्रातील शांतता कायम राखणे/औद्योगिक संबध सौहार्दपूर्ण व शांततेने राखणे.

५. मालक - कामगार संघटनाच्या संबंधात पोषक वातावरण निर्माण करुन, निकोप औद्योगिक संबंध वृध्धीगत करुन कामगारांच्या न्याय हक्कांचे संरक्षण करणे हे कामगार विभागाचे प्रमुख कार्य आहे. कामगारांच्या खास करुन असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या विविध समस्या विचारात घेऊन अशा वर्गाच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी कामगार विभाग सतत प्रयत्नशील राहीला आहे.

६. कामगार आयुक्तालयाकडे एकूण २६ कामगार अधिनियमांचे प्रशासन व कार्यान्वयन सुपूर्द केलेले आहे. या २६ पैकी १९ कायदे केंद्रीय कामगार अधिनियम असून उर्वरित ७ कायदे हे राज्य कामगार अधिनियम आहेत. केंद्रीय कामगार अधिनियम व राज्य कामगार अधिनियम पुढीलप्रमाणे आहेत.

कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिपत्याखालील कार्यालयाकडून पुढीलप्रमाणे विविध कामगार अधिनियमांची अमंलबजावणी करण्यात येते.

| **अ.क्र.** | **केंद्रीय कामगार अधिनियम** |
|---|---|
| १ | औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ |
| २ | बोनस प्रदान अधिनियम, १९६५ |
| ३ | कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन अधिनियम), १९४७ |
| ४ | बिडी व सिगार कामगार (नोकरीविषयक अटी) अधिनियम, १९६६ |

| | |
|---|---|
| ५ | किमान वेतन अधिनियम, १९४८ |
| ६ | मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ |
| ७ | वेतन प्रदान अधिनियम, १९३६ |
| ८ | श्रमिक पत्रकार आणि पत्रकारेत्तर(सेवाशर्ती), संकीर्ण अधिनियम १९५५ |
| ९ | औद्योगिक सेवायोजन (स्थायी आदेश) आधिनियम १९४६ |
| १० | श्रमिक संघ अधिनियम, १९२६ |
| ११ | प्रसुती लाभ अधिनियम, १९६१ |
| १२ | समान वेतन अधिनियम, १९७६ |
| १३ | वेठबिगार पध्दत (निमुर्लन) अधिनियम, १९७६ |
| १४ | विक्री संवर्धन कामगार (सेवाशर्ती) अधिनियम १९७६ |
| १५ | उपदान प्रदान अधिनियम, १९७२ |
| १६ | आंतरराज्य स्थलांतरीत कामगार (रोजगारांचे नियमन आणि सेवाशर्ती) अधिनियम, १९७९ |
| १७ | बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ |
| १८ | इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६ |
| १९ | नोंदवहया व अभिलेख अद्ययावत ठेवणेबाबत छोटया आस्थापनांना सूट मिळणेबाबत अधिनियम, १९९६ |

| राज्य कामगार कायदे | |
|---|---|
| १ | महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ |
| २ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरी व सेवाशर्तीचे विनीयमन) अधिनीयम, २०१७ |
| ३ | महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ |
| ४ | महाराष्ट्र कामगार संघटना मान्यता आणि कामगार अनुचित प्रथा प्रतिबंध अधिनियम १९७१ |
| ५ | महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीने नियमन व कल्याण) अधिनियमद १९८१ |
| ६ | महाराष्ट्र कामगार किमान घरभाडे भत्ता अधिनियम १९८३ |
| ७ | महाराष्ट्र घरेलू कामगार अधिनियम, २००९ |

७. कामगार हे बहुतांश अशिक्षित, गरजू असल्याने तसेच ते असंघटित असल्याने त्यांची मालक वर्गाकडून पिळवणूक होण्याची जास्त शक्यता असते. करिता त्यांना त्यांच्या रोजगारांच्या किमान सेवाशर्ती प्राप्त व्हाव्यात व त्यांना सामजिक सुरक्षितता प्रदान करण्याच्या हेतूने विविध कामगार कायद्यांमध्ये कामगांराचे हक्क निर्माण करुन त्यांना संरक्षण देण्यात आलेले आहे. या कामगार कायद्याची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी मालक वर्गाकडून केली जात आहे किंवा कसे यांची खात्री करुन घेण्याकरिता असे कामगार ज्या ठिकाणी कार्यरत आहेत, अशा कार्यस्थळाचे निरीक्षण करण्याकरिता आयुक्तालयातील कामगार आयुक्तापासून तर निम्न स्तरावरील सरकारी कामगार अधिकारी तसेच सुवि विधाकार किमान वेतन निरीक्षक (सुविधाकार) यांची विविध अधिनियमांतर्गत “निरीक्षक” म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे ज्या अधिका-यांची/कर्मचा-यांची नियुक्ती अधिनियमांतर्गत "निरीक्षक" म्हणून करण्यात आलेली आहे असे अधिकारी/कर्मचारी त्यांना नेमून देण्यात आलेल्या भोगौलिक कार्यक्षेत्रातील विविध

आस्थापनांना/उद्योगांना निरीक्षण भेटी देऊन या भेटीच्या वेळी प्रत्यक्ष कामगांराच्या सेवाशर्तीबाबत त्यांना विविध अधिनियमांतर्गत लाभ, सोयीसुविधा नियोक्त्याकडून दिल्या जातात किंवा कसे यांची तपासणी करुन खात्री करुन घेतात व कामगारांना अधिनियमानुसार मिळणारे लाभ, फायदे सोयीसुविधा मिळत नसतील तर त्या मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. किबहुना ते मिळवून देण्याकरिता त्यांना कायद्याने दिलेल्या अधिकारानुसार आवश्यक ती कारवाई ते करतात. याबाबत नियोक्त्याविरुध्द विविध न्यायालयात अभियोग दाखल करणे किंवा वसूली दावे दाखल करणे यांचा समावेश होतो.

८. महाराष्ट्र शासनाचे शासकीय व्यवहारात पारदर्शकता आणून शासकीय कामकाज लोकाभिमुख करण्याचे धोरण आहे. त्याला अनुसरुन कार्यालयाच्या प्रत्येक विभागांत चालणा-या कामकाजाची रुपरेखा व कार्यपध्दती जाणून घेण्याचा (सर्व नागरिकांना हक्क आहे. राज्य शासनाने शासकीय कामकाजात सुधारणा होण्यासाठी नुकतीच काही मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत. यात पारदर्शकता, लोकांच्या प्रती दायित्व वाढवणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे, कायदे सोपे करणे व नागरिकांची सनद अमंलात आणणे इत्यादींचा समावेश आहे. शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.१०९९/प्र.क्र ३९/९९/१८, अ दि. ०८.०३.२००० अन्वये नागरिकांची सनद तयार करण्यासाठी शासन आदेश निर्गमित केले आहे.

९. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिपत्याखालील उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे २६ विविध कामगार अधिनियमांचे प्रशासन व अमंलबजावणी केली जाते. नागरिकांची सनद तयार करण्यासाठी अधिनियमांर्गत प्राधान्यांने ज्या ज्या सेवा पुरविल्या जातात तो निकष धरुन खालील १४ अधिनियमांकरिता नागरिकाची सनदबाबत विहित प्रपत्रात (जेथे आवश्यक आहे तेथे टिप्पणीसह) माहिती पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरी व सेवाशर्तीचे विनीयमन) अधिनीयम, २०१७ |
| २ | औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ |
| ३ | अधिनियम औद्योगिक सेवायोजन (स्थायी आदेश) अधिनियम १९४६ |
| ४ | श्रमिक संघ अधिनियम, १९२६ |

| | |
|---|---|
| ५ | महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ |
| ६ | कंत्राटी कामगार (नियमन व निमुर्लन) अधिनियम १९७० |
| ७ | बोनस प्रदान अधिनियम १९६५ |
| ८ | मोटार परिवहन कामगार अधिनियम १९६१ |
| ९ | बिडी व सिगार कामगार (सेवाशर्ती) अधिनियम १९६६ |
| १० | उपदान प्रदान अधिनियम, १९७२ |
| ११ | समान वेतन अधिनियम, १९७६ |
| १२ | महाराष्ट्र कामगार किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३ |
| १३ | इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६ |
| १४ | प्रसुती लाभ अधिनियम, १९६१ |

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७.**

केंद्र शासनाने BRAP (BUSINESS REFORMS ACTION PLAN), २०१७-१८ अन्वये Ease fo Doing Business या योजनेअंतर्गत प्रत्येक विभागातील कार्यपध्दती तसेच त्या विभागामार्फत चालविण्यात येणा-या अधिनियमांमध्ये सुधारणा करण्याबाबत मुद्दे दिले होते. त्याचप्रमाणे विविध अधिनियमात सुधारणा करण्याची मोहिम केंद्रशासनाने राबविली आहे.

दुकाने व आस्थापना हा राज्य शासनाचा अधिनियम असल्याने तो प्रत्येक राज्यात स्वतंत्रपणे राबविला जातो. सदर अधिनियमातील तरतुदी व त्यांच्या अंमलबजावणीबाबत संपुर्ण भारतात सूसुत्रता व एकरूपता असावी म्हणून केंद्रशासनाने दुकाने व आस्थापना मॉडेल बील, २०१६ असे बील तयार केले. सदर बीलाच्या प्रारूपास केंद्रीय मंत्रीमंडळाने मान्यता दिली. सदर मॉडेल शॉप बील हे प्रत्येक राज्य शासनास त्यांच्या स्तरावर आवश्यक त्या सुधारणा करून अधिनियमांच्या स्वरूपात पारीत करावे असे केंद्र शासनाने निर्देश दिले होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने आवश्यक असलेल्या सुधारणा अंतर्भूत करून महाराष्ट्र दुकाने दुकाने व आस्थापना आापना अधिनियम, १९४८ ऐवजी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नोकरी व सेवाशर्तीचे विनियमन विनीयमन अधिनीयम, अधिनीयम २०१७ हा नविन अधिनियम पारीत केला. सन २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात सदर विधेयक सभागृहात मांडण्यात आहेते आहे येऊन पारीत करण्यात आले. दिनांक १९.१२.२०१७ पासून सदर अधिनियम संपूर्ण राज्यात लागू करण्यात आला. तसेच महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनीयमन) नियम, २०१८ दि.२३.०३.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिनियमाची अंमलबजावणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्याबाबतची अधिसूचना निर्गमित करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य हे देशातील प्रथम राज्य आहे कि, ज्यांनी केंद्र शासनाच्या मॉडेल शॉप बील प्रमाणे नवीन महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनीयमन) अधिनीयम, २०१७ व महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरी व सेवाशर्तीचे विनीयमन) नियम,२०१८ पारीत केला आहे.

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनीयमन) अधिनियम, २०१७ :-**

- महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनीयमन) अधिनियम, २०१७ दि.०७.०९.२०१७ रोजी राजपत्रामध्ये अधिनियम प्रसिध्द करण्यात आला आहे.
- दि.१९.१२.२०१७ पासून सदर आधानयम सपूण राज्यात लागू करण्यात यत असल्याबाबतचा आधिसूचना निगमित करण्यात आला आहे.

- तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिनियमांची अंमलबजावणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्याबाबतची अधिसूचना दि.१९.१२.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आली आहे.
- उक्त अधिनियमांतर्गत नव्याने तयार करण्यात आलेले महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनीयमन) नियम, २०१८ प्रसिध्द करण्यात आले आहेत.

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनीयमन) अधिनियम, 2017 अंतर्गत खालील सेवा ऑनलाईन संगणक प्रणालीव्दारे देण्याबाबत आज्ञावली सुरू करण्यात आली आहे. तसेच सदर सेवांकरिता विहीत केलेले अर्जाचे नमुने ऑनलाईन प्रणालीवर उपलब्ध आहेत.**

नियम ३ नुसार १० पेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांसाठी नोंदणी करण्यासाठी अर्ज नमूना - " अ"

नियम - ८ नुसार १० पेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापनांसाठी आस्थापना सुरू केल्याबाबत सुचनापत्र देण्याकरिता अर्ज नमूना - "फ"

नियम – ९ नुसार १० पेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापनांसाठी सुचनापत्र दिल्याची पावती नमूना -""

नियम - १० नुसार १० पेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांसाठी नोंदणी प्रमाणपत्रात बदल करण्याकरिता अर्ज नमूना - " आय "

नियम – ११ (१) नुसार १० पेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांसाठी व्यवसाय बंद केल्याबाबत सूचना देण्याकरिता अर्ज नमूना -"जे "

नियम – १२ (२) नुसार १० पेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापनांसाठी व्यवसाय बंद केल्याबाबत सूचना देण्याकरिता अर्ज नमूना -"के"

नियम - उक्त ऑनलाईन सेवांकरिता कोणतेही शुल्क आकारले जात नाही. केवळ व्यवहार आकार (Transaction Charges) रूपये २०/- + कर असे आकारले जाते.

**सदर अधिनीयमांची ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत :-**

- १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांना लागू करण्यात आलेला आहे.
- आस्थापना वर्षाचे ३६५ दिवस व चोवीस तास व्यवसायाकरिता खुली ठेवण्याची तरतूद आहे.
- १० पेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापनांनी केवळ व्यवसाय सुरू केल्याची सुचना देणे आवश्यक आहे.
- १० व त्यापेक्षा जास्त् कामगार असलेल्या आस्थापनांना व्यवसायाची नोंदणी करणे आवश्यक असून त्यांना एकाच वेळी १० वर्षापर्यंत नुतनीकरण करता येईल अशी १०० अशी तरतूद आहे. भूतनीकरणाची आवश्यकता काढून टाकण्यात आली आहे.
- आस्थापनेची नोंदणी व सुचनापत्र स्वयं-साक्षांकित दस्तावेज व स्वयं-घोषणापत्राच्या आधारे ऑनलाईन संगणकीय प्रणालीव्दारे देण्याची तरतूद आहे.
- सदर अधिनीयमामध्ये अर्जित रजेव्यतिरीक्त ८ दिवसाची नैमित्तिक रजा व ८ दिवसांची सणांची रजेची तरतुद केली आहे.
- कामगारांच्या सेवाशर्ती संदर्भात तरतुदी आहेत. उदा. पिण्याच्या पाण्याची सोय, प्रथमोपचार, पुरेसे वायुविजन, उपहारगृह, पाळणाघर अग्निप्रतिबंधक उपाय योजना इत्यादि.
- महिलांना काही अटी व शर्तीच्या अधीन राहून अधीन राहून आस्थापनानिहाय रात्री काम करण्याची सूट देण्याबाबत तरतूद आहे.
- या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास किमान दंडाची तरतूद १ लाख व कमाल दंडाची तरतूद ५ लाखापर्यंत आहे. (तथापि, प्रति कामगार रू.२०००/- पेक्षा जास्त नसावी) तसेच कामाच्या ठिकाणी अपघात झाल्यास कैदेच्या शीक्षेची तरतूद आहे.
- "दुकाने निरिक्षक" ऐवजी "सुविधाकार" ही संकल्पना अंतर्भूत केली आहे.
- सामायीक बार्षीक विवरणपत्र ऑनलाईन सादर कण्याची तरतूद आहे.

# १. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशतीचे विनीयमन) अधिनीयम, २०१७

| अ.क्र. | विभागाकडून /कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | त्यासाठी जोडावयाचे कागदपत्रे | आवश्यक कागदपत्राची पूर्तता केल्यानंतर किती कालापवधीत सेवा पूरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास त्या ज्याच्यांकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व दूरध्वणी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नांकरीच व सेवाशतीचे विनीयमन) २०१७ अंतर्गत आस्थापनाची नोंदणी (१० व त्यापेक्षा जास्त कामगार) | १. नमुना अ मध्ये अर्ज<br>इलेक्ट्रानिक व्यवहार किंवा सेवा मुल्य, विहित कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया<br>Lms.mahaonline.gov.in<br>Maitre.mahaonline.gov.in<br>mahakamgar.maharashatr a.gov.in<br>या सकनस्थळास<br>भेट द्यावी. | अर्ज सादर केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच १ दिवसात अर्ज परिपूर्ण असल्यास) | सुविधाकार | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत विनिर्दिष्टीत करण्यात आलेल्या प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी |
| २ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व | १.नमुना फ मध्ये अर्ज<br>२.इलेक्ट्रॉनिक व्यवहार किवा सेवा | अर्ज केल्यानंतर त्वरीत ऑनलाईन प्राप्त होते. | मे. महाआयटी कंपनी | वरीलप्रमाणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सेवाशर्तीचे विनीयमन ) अधिनियम,२०१७अंतर्गत आस्थापनाची नोंदणी (० ते ९ कामगार) | मूल्य, विहित कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया Lms.mahaonline.gov.in Maitre.mahaonline.gov.in mahakamgar.maharashatr a.gov.in या सकनस्थळास भेट द्यावी. | | | |
| ३ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनीयमन) अधिनियमन-२०१७ अंतर्गत आस्थापनांच्या नोंदणी प्रमाणपत्रातील बदल | १.नमुना आय मध्ये अर्ज २.इलेक्ट्रॉनिक व्यवहार किंवा सेवा मुल्य, विहित कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कुपया Lms.mahaonline.gov.in mahakamgar.maharashatr a.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी. | अर्ज सादर केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवसात (अर्ज परिपूर्ण असल्यास) | मे. महाआयटी कंपनी | वरीलप्रमाणे |

**२. औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ अंतर्गत कामगार व मालक यांच्यामध्ये उपस्थित होणाऱ्या वैयक्तिक व सामुहीक विवाद प्रकरणी तडजो घडवून आणण्याचे काम कामगार आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात येते. उभयमान्य समेट न झाल्यास अशी प्रकरणे अभिनिर्णयार्थ औद्योगिक न्यायाधिकरण/ कामगार न्यायालय यांच्याकडे पाठविली जातात.**

| अ.क्र. | अर्जाचा विषय/तपशील | अर्जासोबत घ्यावयाची कागदपत्रे | अर्ज निकाली काढण्यास लागणार कालावधी | अर्ज निकाली काढण्यास सक्षम असणारे अधिकारी | विहित मुदतीत निकाल न मिळाल्यास कोणाकडे तक्रार करावी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | २(अ) | ३. | ४. | ५. |
| १. | कलम २(अ) प्रकरण | १.कलम-२ (अ) व्यवस्थापनास दिलेल्या मागणी नोटिसची प्रत.<br>२.समेट अधिकारी यांच्याकडे दाखल करावयाचे मध्यस्थी पत्र<br>३.अर्जदार यांच्या मागणी पृष्ठयार्थ समर्थन पत्र.<br>४.व्यवस्थापन व अर्जदाराचा संपूर्ण तपशील व पूर्ण पत्ता.<br>५.नोकरीचा कालावधी, पदनाम वेतन इ.बाबत अभिलेखे. | जास्तीत जास्त ४५ दिवस | सरकारी कामगार अधिकारी | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई ०२२-२६५७२९३७, २६५७३७८३,२६५७३८७२ किंवा विभागीय कार्यालय प्रमुख अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग- ०२२-२६५७२९३७<br>अपर कामगार आयुक्त, पुणे ०२२-२५५४१३१६,<br>अपर कामगार आयुक्त, नागपूर ०७१२-२९८०२७३/२७५<br>कामगार उप आयुक्त, नाशिक ०२५३-२३५१७९७,<br>कामगार उप आयुक्त,छ.संभाजीनगर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | ०२४०-२३३४६२६<br>कामगार उप आयुक्त, अमरावती<br>०७१२-२६६२११५ |
| | टिप : औद्योगिक विवाद अधिनियम-१९४७ कलम-२ (अ) अंतर्गत अर्जदारास मा. कामगार न्यायलयात विवाद उपस्थित करण्याची तरतूद आहे. | | | | |
| २ | कलम २ (क) सामुहिम विवाद | १.व्यवस्थापनास सादर केलेली मागणी पत्रे व या कार्यालयास दिलेली मध्यस्थी पत्र.<br>२.मागण्यासाठी समर्थन पत्रे<br>३.संघटनेच्या बाबतीत त्यांच्या न्यायालयीन मान्यतेबाबतची माहिती (लागू असलेल्या ठिकाणी) | ९० दिवस | सहायक कामगार आयुक्त/कामगार उपआयुक्त/अपर कामगार आयुक्त | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई ०२२-२६५७२९३७,२६५७३७८३,२६५७३८७२ किंवा विभागीय कार्यालय प्रमुख अपर कामगार आयुक्त, कोकण-०२२-२६५७२९३७<br>अपर कामगार आयुक्त, पुणे<br>०२२-२५५४१३१६,<br>अपर कामगार आयुक्त, नागपूर<br>०७१२-२९८०२७३/२७५<br>कामगार उप आयुक्त, नाशिक<br>०२५३-२३५१७९७,<br>कामगार उप आयुक्त,छ.संभाजीनगर<br>०२४०-२३३४६२६<br>कामगार उप आयुक्त, अमरावती<br>०७१२-२६६२११५ |
| ३. | असफल अहवाल साद करणे कलम १२(४) | समेट कार्यवाही निष्फळ ठरल्यास | १४ दिवस | कामगार उप आयुक्त/सहायक | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी | ०२२२६५७२९३७,२६५७३७८३,२६५७३८७२ |
| ४. | संप/टाळेबंदी प्रकरणाचा विवाद (कलम २२,२३,२४) कलम १२ (२) | पूर्व सुचना/पत्र/अथवा तक्रार प्राप्त झाल्यास | सूचना पत्र प्राप्त होताच समेट कार्यवाही सुरु करणे ९० दिवस | सहायक कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त/अपर कामगार आयुक्त | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई ०२२२६५७२९३७,२६५७३७८३,२६५७३८७२ |
| ५. | न्यायालयीन निवाडा प्रसिद्ध करणे. कलम १७ (१) | निवाड्याची प्रमाणित प्रत प्राप्त झाल्यावर | ३० दिवस | कामगार उप आयुक्त/अपर कामगार आयुक्त/ कामगार आयुक्त | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई ०२२२६५७२९३७,२६५७३७८३,२६५७३८७२ |
| ६. | वसुली प्रमाणपत्र कलम ३३ (सी) (१) | अर्ज/नमुना न्यायालयीन निवाड्याची प्रत, व्यवस्थानाकडे पाठविलेले मागणीपत्र, कराराची प्रत इत्यादी | ९० दिवस | सहायक कामगार आयुक्त | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई ०२२-२६५७२९३७, २६५७३७८३, २६५७३८७२ किंवा विभागीय कार्यालय प्रमुख अपर कामगार आयुक्त, कोकण-०२२-२६५७२९३७<br>अपर कामगार आयुक्त, पुणे ०२२-२५५४१३१६,<br>अपर कामगार आयुक्त, नागपूर ०७१२-२९८०२७३/२७५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | कामगार उप आयुक्त, नाशिक ०२५३-२३५१७९७,<br>कामगार उप आयुक्त,छ.संभाजीनगर ०२४०-२३३४६२६<br>कामगार उप आयुक्त, अमरावती ०७१२-२६६२११५ |
| ७. | कलम ५(ब) प्रकरणे कामगारांना ले ऑफ देणे परवानगी देणे, कलम २५(एम) कामगार कपातीसाठी परवानगी देणे, कलम २५ (एन) कारखाना बंद करण्यासाठी परवानगी देणे , | कलम २५ एम नुसार अर्ज व इतर माहिती, कलम २५ एन नुसार अर्ज व इतर माहिती | ६० दिवस | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त (२५ एम व एन) कामगार उप आयुक्त/ अपर कामगार आयुक्त | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई ०२२२६५७२९३७, २६५७३७८३, २६५७३८७२ |
| | कलम २५(ओ) | कलम २५(ओ) नुसार अर्ज व इतर माहिती | ६० दिवस | कलम २५(ओ) शासनास अधिकार | अपील प्राधिकृत न्यायाधिकरण |
| ८. | पुनर्विलोकन अर्ज २५ एम | विहित अर्ज (आदेशाच्या प्रतीसह) | ६० दिवस (मुळ अर्ज) | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई ०२२२६५७२९३७, २६५७३७८३, २६५७३८७२ |

## ३. औद्योगिक सेवायोजन (स्थायी आदेश),१९४६

**औद्योगिक रोजगार (स्थायी आदेश), १९४६ अंतर्गत औद्योगिक कामगारांच्याबाबतीत त्यांच्या सेवाशर्तीसंदर्भातील बाबी सुस्पष्ट स्वरुपात मांडणे ह्या या अधिनियमांचा प्रमुख हेतूकरुन घेण्याच्या तरतूदी आहेत.**

| अ.क्र. | विषय | आवश्यक ती कागदपत्रे | कालावधी | संबंधित अधिकारी | तक्रार कोणाकडे करावी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | २(अ) | ३. | ४. | ५. |
| १. | स्थायी आदेश प्रमाणीत करणे | प्रमाणित करावयाचे स्थायी आदेशाचे प्रारुप अर्जासह | ९० दिवस | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त | कामगार आयुक्त, मुंबई ०२२२६५७२९३७,२६५७३७८३,२६५७३८७२ |
| २. | प्रमाणित स्थायी आदेशात सुधारणा करणे | सुधारित करावयाचे स्थायी आदेशाचे प्रारुप अर्जासह | ९० दिवस | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त | कामगार आयुक्त, मुंबई ०२२२६५७२९३७,२६५७३७८३,२६५७३८७२ |

## ४.श्रमिक संघ अधिनियम, १९२६ (कार्यासन-९)

| अ.क्र. | विभागाकडून/कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | सेवा पूरविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारे अधिकारी/कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी. |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | २(अ) | ३. | ४. | ५. |
| **१** | श्रमिक संघ अधिनियम १९२६ अंतर्गत कोणत्याही व्यवसाय काम करणाऱ्या ७ किंवा अधिक व्यक्ती/सभासद या अधिनियमांतर्गत कामगार/अधिकारी/मालक याच्या संघटनांची नोंद करु शकतात. | उक्त अधिनियमांतर्गत मुंबई श्रमिक संघ अधिनिम, १९२७ नुसार नमुना अ मध्ये उप निबंधाकाकडे अर्ज करावा लागतो. नोंदणी अर्ज उप निबंधक कार्यालयामध्ये विनामुल्य दिला जातो. सदरहू अर्जा सोबत संघटनेच्या घटनेची प्रत जोडावी लागते. अर्जासोबत नोंदणी शुल्क खालीलप्रमाणे भरणे आवश्यक आहे.<br>१.१००० पर्यंत सभासद संख्या शुल्क रु ४५०/- | ४५ दिवस | सहायक कामगार आयुक्त/ उप निबंधक, श्रमिक संघ अधिनियम | अपर कामगार आयुक्त, कामगार उप आयुक्त, तथा अतिरिक्त निबंधक श्रमिक संघ अधिनियम १९२६.<br>अपर कामगार आयुक्त, कोकण-०२२-२६५७२९३७<br>अपर कामगार आयुक्त, पुणे ०२२-२५५४१३१६, |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २.१००० पेक्षा जास्त सभासद संख्या शुल्क रु ६००/- | | | अपर कामगार आयुक्त, नागपूर ०७१२-२९८०२७३/२७५ कामगार उप आयुक्त, नाशिक ०२५३-२३५१७९७, कामगार उप आयुक्त,छ.संभाजीनगर ०२४०-२३३४६२६ कामगार उप आयुक्त, अमरावती ०७१२-२६६२११५ |
| **२.** | संघटनेच्या नियमामध्ये/नावामध्ये पत्त्यामध्ये बदल झालयास त्यांची शहानिशा करुन नोंद करणे. दोन किंवा अधिक संघटनाचे विलिनिकरण किंवा विघटनांची नोंद करणे व प्रमाणित प्रत | विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. सदरहू अर्ज उपनिबंधकच्या नावे करावे लागतील. अर्ज व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर केलेली कार्यवाही योग्य असल्याची खात्री झाल्यावर सदरहू बाब नोंदणीकरिता रुपये | अर्जाची शहानिशा झाल्यानंतर १५ दिवसांमध्ये कार्यवाही करण्यात येते | सहायक कामगार आयुक्त/उपनिबंधक श्रमिक संघ अधिनियक-१९२६ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ५०/- शुल्क भरणे आवश्क आहे. | | | |
| ३ | संघटनेमध्ये पदाधिकारी, सभासद यांच्या अस्तित्वाबाबत अथवा संघटनेच्या मालमत्तेबाबत वाद निर्माण होऊ शकतात अशा प्रकारे वाद उपस्थित झाल्यास नमुना क मध्ये सभासदांना उप निबंधकाकडे अर्ज करुन दाद मागता येते. सर्व संबंधितांच्या सुनावणीनंतर व कागदपत्राची तपासणी करुन प्रथमदर्शनी विवाद आढळ्यास अर्जदारास औद्योगिक न्यायालयात जाण्यासाठी संमतीपत्र देणे | नमुना क्र मध्ये सभासदांना उपनिबधांकाकडे अर्ज करावा लागतो. तक्रार योग्य असल्यास पुढील कार्यवाही करिता नमुना “एम” मध्ये संमतीपत्र देण्यात येते | ३० दिवसाच्या आत निर्णय घेणत येतो. | सहायक कामगार आयुक्त/ उपनिबंधक श्रमिक संघ अधिनियम-१९२६ | |

## ५ महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६

| अ.क्र. | विभागाकडून/कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक ती कागदपत्रे | आवश्यक कागदपत्रांचे पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणार अधिकारी/कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पूरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | २(अ) | ३. | ४. | ५. |
| १ | कलम १३/१४<br>मान्यताप्राप्त संघटना | संघटनेची नोंदणी<br>१.अर्ज<br>२.संघटना नोंदणी दाखला<br>३.नोंदणी करण्यासाठी संघटनेच्या ठरावाची प्रत.<br>४.सदस्य संख्या व उद्योगातील सभासद संघटना व टक्केवारी<br>५.कामगार संघटनेच्या घटनेची प्रती<br>६.सदस्य नोंदणी पुस्तिका<br>७.अर्जाच्या ९ महिन्यांपूर्वीच्या कामगार सदस्याची वर्गणी स्थळप्रत.<br>८.कार्यकारिणी सर्व साधारण सभेचे पुस्तक<br>९.रोखवही<br>१०.बँक पासबूक<br>११. अर्जा पूर्वीच्या ७ महिन्यांपूर्वी लेखापरिक्षण अन्वेषण अहवाल.<br>१२.नोंदणी रद्द करण्याबाबत आवश्यक | संपूर्ण नोंदणी प्रक्रियेस ३० दिवसांचा कालावधी (अपवादात्मक परिस्थितीत निवडणूक घेण्याकरिता ६ महिण्याचा कालावधी आवश्यक) | सहायक कामगार आयुक्त तथा सहाय्यक संघ निबंधक | अपर कामगार आयुक्त, कोकण-०२२-२६५७२९३७<br>अपर कामगार आयुक्त, पुणे ०२२-२५५४१३१६,<br>अपर कामगार आयुक्त, नागपूर ०७१२-२९८०२७३/२७५<br>कामगार उप आयुक्त, नाशिक ०२५३-२३५१७९७,<br>कामगार उप आयुक्त,छ.संभाजीनगर ०२४०-२३३४६२६<br>कामगार उप आयुक्त, अमरावती ०७१२-२६६२११५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कागदपत्रे. | | | |
| २ | कलम ४२-ए नुसार बदला बाबत उभयपक्षांमध्ये वाटाघाटी होऊन एकमत झाल्यास तसे करारपत्र रजिस्ट्रार ऑफ युनियनस कडे पाठविल्यानंतर ते करारपत्र नोंदपुस्तकात नोंदवुन घेणे. | १.कराराची प्रत<br>२.कलम ४२(२) अन्वये बदलाची नोटीस | ६० दिवस | सहायक कामगार आयुक्त/ श्रमिक संघ निबंधक | अनुसूची-३ नुसार बदल असल्यास मा.कामगार न्यायालयाकडे दाद मागता येते व बदल अनुसूची-३ मधील बाब क्र.५ नुसार असल्यास औद्योगिक न्यायालयात दाद मागता येते. |
| ३ | स्थायी आदेशास मा. कामगार आयुक्त यांची मान्यता. | स्थायी आदेश (कलम-३५) नुसार स्थायी आदेश मसुदा अर्जासह | ६० दिवस<br>स्थायी आदेश मसुदा प्राप्त झाल्यानंतर कामगार/मालक पतिनिधी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मा.कामगार आयुक्तांना योग्य वाटल्यास स्थायी आदेश निश्चित करुन निबंधकांकडे पाठविल्यापासून १५ दिवसांमध्ये सदर स्थायी आदेशाची नोंद घेतली जाते | मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | मा. कामगार आयुक्त यांनी दिलेला निर्णय व्यवस्थापनास मान्य नसेल तर ३० दिवसांच्या आत औद्योगिक न्यायालयाकडे दाद मागता येईल. |

## ६.कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन )अधिनियम १९७०

| अ.क्र. | विभागाकडून/कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक ती कागदपत्रे | आवश्यक कागदपत्रांचे पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणार अधिकारी/कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पूरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | २(अ) | ३. | ४. | ५. |
| १ | मुख्य मालकांची नोंदणी | १.फॉर्म-I<br>२.मुख्य मालकाचे घोषणापत्र परिशिष्ट ‘अ’ व ‘ब’<br>३.विहीत शुल्क<br>(इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया www.Lms.mahaonline.gov.in<br>mahakamgar.maharashatr a.gov.in या संकेतस्थळास<br>भेट द्यावी.) | ७ दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |
| २ | परवाना (अनुज्ञाप्ती) | १. फॉर्म-IV<br>२. मुख्य मालकाचे घोषणापत्र परिशिष्ट ‘अ’ व ‘ब’<br>३. फॉर्म-V | ७ दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ४. विहीत शुल्क<br>५. अनामत रक्कम<br>(इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्यायावत माहितीसाठी कृपया www.lms.mahaonline.gov.in अथवा www.mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | | | |
| ३. | परवान्याचे (अनुज्ञाप्ती) नुतनीकरण | १. फॉर्म-VII<br>२. मुख्य मालकाचे घोषणापत्र परिशिष्ट 'अ' व 'ब'<br>३. विहीत शुल्क<br>(इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्यायावत माहितीसाठी कृपया www.lms.mahaonline.gov.in अथवा www.mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | ७ दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |
| ४. | मुख्य मालकाच्या नोंदणी प्रमाणपत्रात बदल | कोणताही बदल १५ दिवसांच्या आत कळवावा. आवश्यक असल्यास विहीत शुल्क (इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्यायावत माहितीसाठी कृपया www.lms.mahaonline.gov.in | ७ दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | अथवा www.mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | | | |
| ५. | नोंदणी /परवाना रद्द केल्यानंतर त्याविरुध्द अपील करणे | ३० दिवसांचे आत लेखी अपील करणे. (इतर अधिक व अद्यायावत माहितीसाठी कृपया www.mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | ९० दिवस | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त | कामगार आयुक्त/ अपर कामगार आयुक्त |
| ६. | अनामत रक्कम परत करणे | परताव्यासाठी अर्जासोबत कंत्राटी कामगार यादी, अनामत रक्कम भरल्याचे चलन व काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र जोडावे. इतर अधिक व अद्यायावत माहितीसाठी कृपया www.mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | ६० दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |

| **७. बोनस प्रदान अधिनियम, १९६५** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | **विभागाकडून / कार्यालयाकडून पुरवली जाणारी सेवा** | **आवश्यक ती कागदपत्रे** | **आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल.** | **सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी** | **सेवा विहित कालावधीत पूरविली न गेल्यास यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |
| **१.** | **२.** | **२(अ)** | **३.** | **४.** | **५.** |
| | बोनस देण्यास मुदतवाढ देणे | लेखा वर्षे संपल्यानंतर ८ महिन्यांचे आत अर्ज करावा. सोबत समर्थन जोडावे | ६० दिवस | कामगार आयुक्त | मा. प्रधान सचिव(कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२. दुरध्वनी क्र.०२२-२२०२७४३३ |

| ९. मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६६ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | **विभागाकडून / कार्यालयाकडून पुरवली जाणारी सेवा** | **आवश्यक ती कागदपत्रे** | **आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल.** | **सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी** | **सेवा विहित कालावधीत पूरविली न गेल्यास यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |
| **१.** | **२.** | **२(अ)** | **३.** | **४.** | **५.** |
| १. | नोंदणी प्रमाणपत्र देणे | १.फॉर्म-I<br>२.मुख्य मालकाचे घोषणापत्र परिशिष्ट 'अ' व 'ब'<br>३.विहीत शुल्क<br>(इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया www.lms.mahaonline.gov.in mahakamgar.maharashatr a.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | १५ दिवस | कामगार उप आयुक्त (ग्रा.वि.) | कामगार आयुक्त |
| २. | नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण | नोंदणी पत्रातील कालावधी संपुष्टात येण्यापूर्वी ६० दिवस नमुना I मध्ये विहित | १५ दिवस | कामगार उप आयुक्त (ग्रा.वि.) | कामगार आयुक्त |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | शुल्कासह अर्ज करावा. मुख्य मालकाचे घोषणापत्र परिशिष्ट ‘अ’ व ‘ब’<br>(इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया www.lms.mahaonline.gov.in mahakamgar.maharashatr a.gov.in या संकेतस्थळास<br>भेट द्यावी.) | | | |

| **९. बिडी व सिगार कामगार (सेवाशर्ती) अधिनियम, १९६६** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **विभागाकडून / कार्यालयाकडून पुरवली जाणारी सेवा** | **आवश्यक ती कागदपत्रे** | **आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल.** | **सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी** | **सेवा विहित कालावधीत पूरविली न गेल्यास यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |
| **१.** | **२.** | **२(अ)** | **३.** | **४.** | **५.** |
| १. | परवाना (अनुज्ञाप्ती) | १.फॉर्म-I<br>२.मुख्य मालकाचे घोषणापत्र<br>परिशिष्ट ‘अ’ व ‘ब’<br>३.कारखान्याचा नकाशा<br>४.विहीत शुल्क<br>(इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया www.lms.mahaonline.gov.in mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास<br>भेट द्यावी.) | १५ दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |
| २. | परवाना व नुतनीकरण | १.फॉर्म-I<br>२.मुख्य मालकाचे घोषणापत्र | १५ दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | परिशिष्ट ‘अ’ व ‘ब’<br>३.विहीत शुल्क<br>(इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया www.lms.mahaonline.gov.in mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास<br>भेट द्यावी.) | | | आयुक्त |

| १०. समान वेतन अधिनियम, १९७६ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **विभागाकडून / कार्यालयाकडून पुरवली जाणारी सेवा** | **आवश्यक ती कागदपत्रे** | **आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल.** | **सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी** | **सेवा विहित कालावधीत पूरविली न गेल्यास यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |
| **१.** | **२.** | **२(अ)** | **३.** | **४.** | **५.** |
| १. | समान वेतन मिळण्यासाठी करावयाचा वसुला दावा | एखाद्या कामगारास एकाच स्वरुपाच्या कामासाठी इतर कामगारापेक्षा कमी वेतन दिले जात असल्यास अशा कामगारास समान वेतन मिळण्यासाठी नमुना ब (बी) तीन प्रतीत अर्ज करता येतो.<br>(विहित कागदपत्रे व अद्ययावत माहितीसाठी कृपया www.mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | १८० दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |
| २. | समान वेतन मिळण्यासाठीचे अपील | सहायक कामगार आयुक्त यांचे आदेशाविरुध्द अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्तांचेकडे अपील करता येतो.<br>(विहित कागदपत्रे व अद्ययावत माहितीसाठी कृपया www.mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | ९०दिवस | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त | न्यायिक प्रक्रिया: अंतिम निर्णय |

| **११. महाराष्ट्र कामगार किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **विभागाकडून / कार्यालयाकडून पुरवली जाणारी सेवा** | **आवश्यक ती कागदपत्रे** | **आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल.** | **सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी** | **सेवा विहित कालावधीत पूरविली न गेल्यास यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |
| **१.** | **२.** | **२(अ)** | **३.** | **४.** | **५.** |
| १. | घरभाडे भत्ता वसुली दावा वसुली दाव्याविरुध्द अपिल | विदित्त केलेला घरभाडे भत्ता न मिळाल्यास कामगारास नमुना (ब) मध्ये वसुली दावा दाखल करता येतो. सहायक कामगार आयुक्तांकडे आदेशाविरुध्द अपिल दाखल करता येते. | १८० दिवस<br>९० दिवस | सहायक कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त | न्यायिक प्रक्रिया: अंतिम निर्णय |

| **१२. प्रसुती लाभ अधिनियम, १९६१** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **विभागाकडून / कार्यालयाकडून पुरवली जाणारी सेवा** | **आवश्यक ती कागदपत्रे** | **आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल.** | **सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी** | **सेवा विहित कालावधीत पूरविली न गेल्यास यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |

| १. | २. | २(अ) | ३. | ४. | ५. |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रसुती लाभ दावा | विहित केलेला प्रसुती लाभ मिळण्यास कामगारास नमुना अर्ज ६ मध्ये वसुली दावा दाखल करावा लागतो.<br>(विहित कागदपत्रे व अद्ययावत माहितीसाठी कृपया www.mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | ९० दिवस | सरकारी कामगार अधिकारी | न्यायिक प्रक्रिया: अंतिम निर्णय |

| **१३. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **विभागाकडून / कार्यालयाकडून पुरवली जाणारी सेवा** | **आवश्यक ती कागदपत्रे** | **आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल.** | **सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी** | **सेवा विहित कालावधीत पूरविली न गेल्यास यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |
| **१.** | **२.** | **२(अ)** | **३.** | **४.** | **५.** |
| १. | इमारत व इतर बांधकाम आस्थापनांची नोंदणी व नुतनीकरण | १.फॉर्म-I<br>२.मुख्य मालकाचे घोषणापत्र परिशिष्ट 'अ' व 'ब'<br>३.विहीत शुल्क | ७ दिवस | सहायक कामगार आयुक्त | कामगार आयुक्त/अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |

| १४.किमान वेतन अधिनियम, १९९६ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **विभागाकडून / कार्यालयाकडून पुरवली जाणारी सेवा** | **आवश्यक ती कागदपत्रे** | **आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल.** | **सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी** | **सेवा विहित कालावधीत पूरविली न गेल्यास यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |
| **१.** | **२.** | **२(अ)** | **३.** | **४.** | **५.** |
| १. | किमान वेतन वसुली दावा | अर्ज व संबंधित कागदपत्रे | किमान वेतन मिळत नसल्याचे आढळून आल्यास ६ महिन्यात अर्ज दाखल करावा. | सहायक कामगार आयुक्त | न्यायिक प्रक्रिया: अंतिम निर्णय |

| १५.आंतरराज्य स्थलांतरीत कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन) अधिनियम, १९७९ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **विभागाकडून / कार्यालयाकडून पुरवली जाणारी सेवा** | **आवश्यक ती कागदपत्रे** | **आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल.** | **सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी** | **सेवा विहित कालावधीत पूरविली न गेल्यास यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |
| **१.** | **२.** | **२(अ)** | **३.** | **४.** | **५.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | मख्य मालकाची नोंदणी | १.फॉर्म-I<br>२.मुख्य मालकाचे घोषणापत्र<br>परिशिष्ट 'अ' व 'ब'<br>३.कारखान्याचा नकाशा<br>४.विहीत शुल्क<br>(इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया www.lms.mahaonline.gov.in अथवा mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | २१ दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |
| २. | स्थलांतरीत कामगारांच्या भर्तीसाठी कंत्राटदारास परवाना (अनुज्ञाप्ती) | १.फॉर्म-IV<br>२.कंत्राटदाराचे घोषणापत्र<br>परिशिष्ट 'अ' व 'ब'<br>३.विहीत शुल्क<br>४.अनामत रक्कम<br>(इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया www.lms.mahaonline.gov.in अथवा mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | २१ दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |
| ३. | स्थलांतरीत कामगारांच्या भर्तीसाठी मध्यस्थी (एजंट) कंत्राटदार परवाना (अनुज्ञाप्ती) | १.फॉर्म-IV<br>२.कंत्राटदाराचे घोषणापत्र<br>परिशिष्ट 'अ' व 'ब'<br>३.विहीत शुल्क<br>४.अनामत रक्कम | २१ दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | (इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया www.lms.mahaonline.gov.in अथवा mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | | | |
| ४. | स्थलांतरीत कामगारांच्या रोजगारासाठी कंत्राटदारास कंत्राटदार परवाना (अनुज्ञाप्ती) | १.फॉर्म-V<br>२.कंत्राटदाराचे घोषणापत्र परिशिष्ट ‘अ’ व ‘ब’<br>३.विहीत शुल्क<br>४.अनामत रक्कम<br>(इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया www.lms.mahaonline.gov.in अथवा mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | २१ दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |
| ५. | मुख्य मालकाची नोंदणी प्रमाणपत्रात बदल | १.फॉर्म-IX<br>२.विहीत शुल्क<br>(इतर विहित नमुन्यातील कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया www.lms.mahaonline.gov.in अथवा mahakamgar.maharashatra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.) | २१ दिवस | सहायक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |

## १६. महाराष्ट्र श्रमिक संघटनाना याबाबत मान्यता देणे व अनुचित कामगार प्रथा प्रतिबंध अधिनियम, १९७१.

यासंदर्भातील देशातला एकमेव कायदा महाराष्ट्र राज्याने सन १९७१ मध्ये निर्गमित केला आहे. यामध्ये २ मुख्य भाग असून औद्योगिक आस्थापनेतील कामगार संघटनेला प्रतिनिधीत्वाचे संपूर्ण अधिकार देण्यासाठी त्या संघटनेला ज्यांच्याकडे एकूण कामगार संख्येपैकी ३०% किंवा अधिक कामगार संख्या सदस्य म्हणून आहेत अशा कामगार संघटनांना मान्यता प्रमाणपत्र, मा. औद्योगिक न्यायालयाकडून, अर्ज करुन विहित प्रक्रियेनंतर प्राप्त करुन घेता येते.

दुसरा महत्वाचा भाग म्हणजे व्यवस्थापनेला अथवा कामगार संघटनेला एकमेंकाविरुध्द अनुचित कामगार प्रथा प्रतिबंध करण्यासाठी मा.औद्योगिक न्यायालय व मा. कामगार न्यायालय येथे तक्रार अर्ज करता येतो.

**कामगार आयुक्त कार्यालयाच्या महत्वपूर्ण बाबी**

**सेवा हमी अधिनियमांतर्गत समाविष्ट १३ सेवा देण्याकरीता विकसित केलेली ऑनलाईन प्रणाली**

- कामगार आयुक्त कार्यालयातील ६ अधिनियमांतर्गत देण्यात येणाऱ्यां एकुण ३ सेवांचा समावेश सेवा हमी अधिनियमांतर्गत करण्यात आला आहे.
- सदर सेवा ऑनलाईन पध्दतीने देण्याकरीता महा आय टी कंपनी पुर्वाश्रमिची महाऑनलाईन यांनी संगणक प्रणाली विकसित केली आहे. सद्य:स्थितीत सर्व सेवा पूर्णपणे ऑनलाईनद्वारे दिल्या जातात.
- ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्जदारास ज्या अधिनियमांतर्गत सेवा आवश्यक असेल त्या अधिनियमांतर्गत सेवेबाबतचा अर्ज, अभिलेख व निर्धारित शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरता येते.  त्यामुळे अर्जदारास प्रत्यक्ष कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही.

- अर्जदारास आवश्यक ती नोंदणी दाखला, सुधारणा केलेला दाखला, नवीन अनुज्ञाप्ती व नुतनीकरण केलेली अनुज्ञाप्ती ऑनलाईन पध्दतीने ई- मेलद्वारे अर्जदारास प्राप्त होते. त्यामुळे अर्जदारास प्रत्यक्ष कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही.

## कामगार आयुक्तालयामार्फत देण्यात येणाऱ्यां ऑनलाईन संगणकिय सेवा

| अ.क्र. | अधिनियमाचे काम | देण्यात येणारी सेवा | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ | व्यवसाय सुरु केल्याबाबत सुचना देणे (Intimation Certificate) | स्वयंसंचलित (Auto Generated) |
| २ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ | नोंदणी प्रमाणपत्र | ०१ दिवस |
| ३ | कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७० | मालकास द्यावयाच्या नोंदणी प्रमाणपत्रास सुधारणा | ०७ दिवस |
| ४ | कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७० | कंत्राटदारास दिलेल्या अनुज्ञाप्तीतील बदल | ०७ दिवस |
| ५ | मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ | नोंदणी प्रमाणपत्रातील बदल | १५ दिवस |
| ६ | बिडी व सिगार कामगार (नोकरीच्या शर्ती) | नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण/बदल | १५ दिवस |
| ७ | इमारत व इतर बांधकाम (कामगारांचे नियमन व शर्ती) अधिनियम, १९९६ | आस्थापनेच्या नोंदणी प्रमाणपत्रातील बदल | १५ दिवस |

टिप :- अर्जदारास विहीत मुदतीमध्ये सेवा प्राप्त न झाल्यास त्यांना ऑनलाईन पध्दतीने deemed Service, आपोआप सेवा ऑनलाईन दिली जाते.

# कामगार आयुक्तालयातर्गत देण्यात येणाऱ्यां सेवांची यादी (मास्टर लिस्ट)

| अ.क्र. | लोकसेवेचा तपशिल | कालावधी | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ अंतर्गत नोंदणी | ०७ दिवस | दुकाने निरीक्षक | सरकारी कामगार अधिकारी | सहाय्यक कामगार आयुक्त |
| २ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण | ०७ दिवस | दुकाने निरीक्षक | सरकारी कामगार अधिकारी | सहाय्यक कामगार आयुक्त |
| ३ | कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७० अंतर्गत मुख्य मालकाची नोंदणी | ०७ दिवस | सहाय्यक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त | सह आयुक्त कामगार (माथाडी) |
| ४ | कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७० अंतर्गत कंत्राटदारास अनुज्ञाप्ती देणे | ०७ दिवस | सहाय्यक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त | सह आयुक्त कामगार (माथाडी) |
| ५ | कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७० अंतर्गत कंत्राटदारास अनुज्ञाप्ती नुतनीकरण करणे | ०७ दिवस | सहाय्यक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त | सह आयुक्त कामगार (माथाडी) |
| ६ | इमारत व इतर बांधकाम कामगार (कामगारांचे नियमन व शर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत नोंदणी | ०७ दिवस | सहाय्यक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त | सह आयुक्त कामगार (माथाडी) |
| ७ | मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ अंतर्गत नोंदणी | १५ दिवस | कामगार उप आयुक्त (ग्रा.वि.) | अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग, मुंबई | सह आयुक्त कामगार (माथाडी) |
| ८ | बिडी व सिगार (नोकरीच्या शर्ती) वर्कर्स | १५ दिवस | सहाय्यक कामगार | अपर कामगार आयुक्त / | सह आयुक्त कामगार |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अधिनियम, १९६६ अंतर्गत औद्योगिक वास्तुची नोंदणी | | आयुक्त | कामगार उप आयुक्त | (माथाडी) |
| ९ | आंतरराज्य स्थलांतरीत कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन) अधिनियम, १९७९ अंतर्गत आस्थापनांना नोंदणी प्रमाणपत्र | २१ दिवस | सहाय्यक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त | सह आयुक्त कामगार (माथाडी) |
| १० | आंतरराज्य स्थलांतरीत कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन) अधिनियम, १९७९ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्रातील सुधारणा | २१ दिवस | सहाय्यक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त | सह आयुक्त कामगार (माथाडी) |
| ११ | आंतरराज्य स्थलांतरीत कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन) अधिनियम, १९७९ अंतर्गत स्थलांतरित कामगारांच्या कंत्राटदारास अनुज्ञाप्ती देणे | २१ दिवस | सहाय्यक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त | सह आयुक्त कामगार (माथाडी) |
| १२ | आंतरराज्य स्थलांतरीत कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन) अधिनियम, १९७९ अंतर्गत स्थलांतरीत कामगारांच्या भर्तीसाठी मध्यस्थी (एजंट) कंत्राटदारास अनुज्ञाप्ती देणे | २१ दिवस | सहाय्यक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त | सह आयुक्त कामगार (माथाडी) |
| १३ | आंतरराज्य स्थलांतरीत कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन) अधिनियम, १९७९ अंतर्गत स्थलांतरीत कामगारांच्या रोजगारासाठी कंत्राटदारांस अनुज्ञाप्ती देणे | २१ दिवस | सहाय्यक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त | सह आयुक्त कामगार (माथाडी) |
| १४ | आंतरराज्य स्थलांतरीत कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन) अधिनियम, १९७९ अंतर्गत कंत्राटदारास अनुज्ञाप्तीचे नुतनीकरण करणे | २१ दिवस | सहाय्यक कामगार आयुक्त | अपर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त | सह आयुक्त कामगार (माथाडी) |